




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
।बीड ।परभणी ।छत्रपती संभाजीनगर ।जालना ।लातूर ।धाराशिव ।हिंगोली ।नांदेड ।नगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ४ थे ● अंक १५२ ● मंगळवार, दि. १० सप्टेंबर २०२४ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●पान १ ● पाने ४ ●किंमत ३ रूपये

बीड ● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955


# गावागावात घोंगडी बैठकीचे नियोजन करा

## ●आचारसंहिता लागण्यापूर्वी आठ दिवस आधी आपण बैठक घेवू आणि मग ठरवू की आपण निवडणूक लढवायची का नाही



(छायाचित्र: वैष्णव घवाडे)

**बीड । प्रतिनिधी**

फडणवीस साहेबांनी फक्त गेसोयऱ्यांची मागणी मान्य करावी आणि मराठ्यांना आरक्षण द्यावं, मी त्यापुढे राजकारणावर एक शब्दही बोलणार नाही असं मनोज जरांगे यांनी म्हटलं. फडणवीसांनी आपल्याविरोधात मराठा आमदार उभे केलेत, त्यांनी जर आरक्षण दिलं नाही तर त्यांना राजकारणात लोळवल्याशिवाय मराठा समाज मागे हटणार नाही असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला. बीडमध्ये झालेल्या घोंगडी बैठकीमध्ये मनोज जरांगे यांनी हे वक्तव्य केलं. गावागावात घोंगडी बैठकीचे नियोजन करा असं सांगत मनोज जरांगे म्हणाले की, हे तीन महिने मराठ्यांचे अस्मितेचे आहेत भविष्याचे आहेत. लढाई माणूस केवळ बेसावध राहिल्यामुळे हरतो. उद्यापासून गावागावात २० पोरांची टीम तयार करा. ज्या गावात अशा टीम तयार होतील त्याच गावात घोंगडी बैठका होतील. गरीब मराठा सगळा बाजूला गेलाय. श्रीमंत मराठ्याला गरीब मराठा जमत नाही. आचारसंहिता लागण्यापूर्वी आठ दिवस आधी आपण बैठक घेवू आणि मग ठरवू की आपण निवडणूक लढवायची का नाही.

देवेंद्र फडणवीसांवर टीका करताना मनोज जरांगे म्हणाले की, तुम्हाला गरिबांची मुलं मोठी व्हावेत असं का वाटत नाही? या सरकारमधील मंत्र्यांना गरिबांची पोरं मोठी होऊ नयेत असं का वाटतं? तुम्हाला फक्त तुमचा पक्ष आणि नेते मोठे करायचे आहेत. देवेंद्र फडणवीस, मराठ्याच्या मुलांनी तुमचं काय वाकडं केलं? मराठ्यांचे आमदार मराठ्यांच्या विरोधात उभे केले. कुठे केसेस करत आहे, कुठे मराठ्यांचे आमदार विरोधात उभे करता. फडणवीस साहेब तुम्हाला लोळवल्याशिवाय आता मराठा समाज मागे हटत नाही. जर तुम्ही आरक्षण दिले नाही तर आम्हाला सत्ता काबीज करावी लागणार. मराठा समाज्याच्या आरक्षणासाठी वाटेल ते करेन.

देवेंद्र फडणवीस साहेब, मी राजकारणाचा एक शब्द काढत नाही, तुम्ही फक्त आरक्षण द्या. मी पुन्हा यावर बोलणार नाही. ➧ (उर्वरित पान २ वर)

### ▸माझ्यावर बोलण्यासाठी बैल बदलले जात आहेत

**तुम्ही ज्या पक्षात काम करत आहे त्या पक्षाचे नेते आम्हाला का आरक्षण देत नाहीत? असा सवाल आता भाजपमधल्या पुढाऱ्यांना त्यांची लेकरं विचारतील असं जरांगे म्हणाले. ते म्हणाले की, तुमच्या लेकरांवरील अन्याय कायम डोळ्यासमोर ठेवा. माझ्या विरोधामध्ये भरपूरजण उभे केले आहेत. आठवड्यालाच आमदार बदलतात. बैल बदलले जात आहेत.**

# छावा आणी चित्ता एकाच सदरेवर

## दीपक केदार यांचा पैथर सोबत असेल : जरांगे पाटील



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात दलित चळवळ नव्याने उभा करणारे संघटन दीपक केदार यांनी नितीन सोनवणे यांच्या रूपाने लोकार्पण केले. बीड जिल्हा कार्यलयाचे उद्घाटन मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी आता आम्ही तिघांनी एकत्र आले पाहिजे असे म्हणत मराठा मुस्लिम दलित यांनी हा महाराष्ट्र पुढे नेण्यासाठी सोबत आले पाहिजे असे म्हटले. यावेळी विचार पिठावर लोकपत्रकार भागवत तावरे, वकील संघाचे अविनाश गंडले उपस्थित होते. या निमित्ताने छावा आणि चित्ता एकत्र आल्याचे चित्र दिसून आले.

बीड भूमीत काल आंबेडकरी वादळाचे कार्यालय उघडण्यात आले. दीपक केदार यांच्या संघटनेकडून जिल्हा कार्यालय उघडण्यात आले उद्घाटन मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

# परळीतील प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न प्राधान्याने सोडवणार : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## प्रकल्पग्रस्तांना ५० %टक्के जागा नोकरीमध्ये मिळणार: पालक मंत्री धंनजय मुंडे यांच्या प्रयत्नांना यश

**बीड । प्रतिनिधी**

प्रकल्प ग्रस्तांना नोकऱ्यांमध्ये योग्य जागा मिळाव्या यासाठी राज्याचे कृषी मंत्री तथा बीड जिल्हयाचे पालकमंत्री धंनजय मुंडे यांनी केलल्या विनंतीला उपमुख्यमंत्री तथा गृह मंत्री व ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी होकार दिला असून यापुढे मंजुर आकृतीबंधाच्या ५०% जागा प्रकल्पग्रस्तांना नोकरीमध्ये मिळणार, असल्याचा आजच्या बैठकीत निर्णय झाला.

आज जिल्हाधिकारी कार्यालयात परळी वैजनाथ येथील थर्मल पावरच्या प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न मार्गी लावण्या बाबत दूरदृष्टी प्रणाली माध्यमातून बैठक आयोजित करण्यात आली, त्यावेळी हा निर्णय घेण्यात आला. यावेळी परळीतील प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न व मागण्या प्राधान्याने सोडवल्या जातील, असा शब्द देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.

मुंबईतील सह्याद्री शासकीय विश्रामगृहातून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक तथा पर्यावरण वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, आमदार चंद्रशेखर बावनकुळे हे यांच्यासह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यासह प्रकल्पग्रंस्त प्रतिनिधी निळकंठ चाटे, श्रीकांत फड, राज गडदे, सुधीर फड, आत्मराम फड, मुजा भांगे, प्रविण मुंडे, प्रमोद नागरगोजे उपस्थित होते.

वीज निर्मिती प्रकल्पग्रस्तांच्या संदर्भात काही समस्या बाबत आज व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आयोजित करण्यात आली यावेळी श्री मुंडे यांनी प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळण्यासाठी विविध मागण्या केल्या. यामध्ये प्रशिक्षण सेवेमध्ये ३ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यांना विनाअट सामावून घेण्यात यावे. कनिष्ठ अभियंता, सहाय्यक अभियंता यांच्या झालेल्या भरतीमध्ये महानिर्मितीचा एकही प्रकल्पग्रस्त घेतला गेलेला नाही, तरी त्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन रिक्त जागेमध्ये प्राधान्य देऊन समावेश करावे, २०१० पासून बंद असलेले तंत्रज्ञ ४ हे पद सुरु करुन त्यामध्ये प्रकल्पग्रस्तांना सामावून घेण्यात यावे, ज्या प्रकल्पग्रस्तांचे वय ४५ वर्षे पूर्ण झाले आहे, त्यांना समान काम समान वेतन या कायद्यान्वये वेतन देण्यात यावे अशा मागण्या होत्या. यावर

➧ (उर्वरित पान २ वर)

# मामू, देखो आये लुटेरे

## आमदारकी के गुलगुले और वल दिया का छल

**▸मुस्लिम बहुल वस्ती आहे ती म्हणजे शहरे, मुस्लिमांच्या आर्थिक सामाजिक व राजकीय केंद्राचे ठिकाण म्हणजे शहरे, त्या अर्थाने आम्ही शहराच्या चाव्या स्वायत्त नेत्यांना सुपूर्द करणे आमचे राजकीय कर्तव्य ठरते मात्र दुर्दैवाने बीड नगर परिषदेच्या चाव्या कधीही स्वयंभु म्हणजे स्वत:च्या मर्जीने काम करणाऱ्या नेत्यांच्या हातात इथल्या प्रस्थापित शक्तीने दिलेल्या नाहीत. यात चुका एका बाजूने झालेल्या नाहीत स्थानिक पातळीवर जी काही नेते उभी राहिली ती परप्रकाशी म्हणजे बंगल्यातून निपजलेली यामुळे मुस्लिम लीडरशिप डेव्हलप झाली नाही.**

### क्रॉसलाईन



कोल्हापूर मध्ये ८ हजार मुस्लिमांत हसन मुशरीफ लोकनेते बनले ते काही धर्माचे राजकारण म्हणून नाही तर त्यांनी स्वत: मधला नेता घडवला. हेच बीड मध्ये मात्र घडले नाही. जेव्हा बीड सारखी जिल्हा नगर परिषद ताब्यात घेण्यासाठी व्युहरचना करायची तेव्हा मुस्लिमांना आमदारकीचे स्वप्न दाखवले जातात आणि एकाला नाही तिघांना, अश्याने मुस्लिम मतांचा बटवारा साधायचा आणि याच काळात नगर परिषेदेत देखील मुस्लिम इतर चेहरा समोर आणायचे म्हणजे मुस्लिमांचे तेल ही जाते आणि तूप ही जाते. विधानसभेत चार मुस्लिमांच्या कोपराला गूळ लाऊन मुस्लिमांच्या लीडर शिप मध्येच स्पर्धा प्रायोजित आहे. म्हणजे नगर परिषदेसाठी एकही नेता बांधणी करणार नाही आणि आमदार बनणे का, मेरे भाई मुस्लिमांचे मत विभाजन ही गेम आहे. लोकसभेत मुस्लिमांची एकी कुठल्या तरी डोळ्यांना खुपते आहे आता ते मुस्लिमांच्या नेत्यात स्पर्धा आयोजित करून भुलवत आहेत हे कुणीतरी समजून घेतले पाहिजे.



दैनिक मराठवाडा पत्रकार्यालय मध्ये श्रींची सकाळची आरती करताना रणझुंजारचे संपादक श्री. राजेंद्र अगवान दादा, दहिवाळ सुवर्णकारचे उद्योजक पवन कुमार दहिवळ, दैनिक मराठवाडा पत्राचे संपादक दत्तात्रय नरनाळे छायाचित्र दिसत आहेत.



दैनिक मराठवाडा पत्र कार्यालयामध्ये श्रींची संध्याकाळची आरती करताना सक्सेस क्लासेसचे संचालक श्रीराम चौभरे सर व सौ. चौभारे ताई, संपादक दत्तात्रय नरनाळेछायाचित्रात दिसत आहेत.







◆ संपादकीय

# समस्येपासून पळायचं नाही, लढायचं आहे

**(जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन विशेष १० सप्टेंबर)**

**▶ आत्महत्या हा कोणत्याही समस्येवरचा उपाय नसून हा गुन्हा आहे. समस्यांपासून दूर पळणे ही दुर्बलता आहे, मनुष्य हा सर्व प्राण्यांमध्ये सर्वात बुद्धिमान आहे, परंतु संपूर्ण जगात मनुष्याशिवाय कोणताही प्राणी किंवा जीव आत्महत्या करत नाही. जेव्हा एखादा जीव सुद्धा आयुष्याच्या शेवटपर्यंत संघर्ष करत असतो, तेव्हा आजच्या आधुनिक समाजात विशेषाधिकारप्राप्त व्यक्ती आत्महत्या का करतो? हे पूर्णपणे अन्यायकारक आहे. जीवनातील प्रत्येक व्यक्तीचा संघर्ष इतरांना चांगले जीवन जगण्याची प्रेरणा देतो. अपयश आपल्याला काय करू नये हे शिकवते. दु:ख असेल तर आनंद आहे, द्वेष असेल तर प्रेम आहे, असत्य असेल तर सत्य आहे, वाईट असेल तर चांगले आहे. प्रत्येक दिवस सारखा नसतो, बदल हा जगाचा नियम आहे. पशू, पक्षी आणि प्राणी कधीही निराश होत नाहीत, जोपर्यंत जीव आहे तोपर्यंत ते काम करतात स्वच्छंदपणे जगतात, जेव्हा त्यांना अडचणी येतात तेव्हा त्यांना कोणीही मदत करत नाही.**

आत्महत्येमुळे जगभरात दरवर्षी ७ लाखांहून अधिक मृत्यू होतात. आत्महत्येचा कुटुंबावर आणि समाजावर खोलवर परिणाम होतो. कुटुंबातील सदस्याच्या मृत्यूनंतर त्याची अनुपस्थिती कोणीही भरून काढू शकत नाही. आत्महत्येमुळे कुटुंबीयांना आर्थिक, मानसिक व सामाजिक यातना सहन कराव्या लागतात. २०२४ ते २०२६ या वर्षासाठी जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन ची त्रैवार्षिक थीम संभाषण सुरू करा या आवाहनासह आत्महत्येवरील कथन बदलणे हे आहे. आत्महत्येपासून बचाव करण्याबद्दल जागरुकता वाढवणे आणि खुल्या संभाषणांना प्रोत्साहन देणे हे या थीमचे उद्दिष्ट आहे. आपण मौन आणि कलंकाच्या संस्कृतीतून मोकळेपणा, समजूतदारपणा आणि समर्थनाच्या संस्कृतीकडे जाऊ शकतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार, आत्महत्येपेक्षा २० पट अधिक लोक आत्महत्येचा प्रयत्न करतात. जगात सरासरी दर ४० सेकंदाला एक आत्महत्या आणि दर ३ सेकंदाला एक आत्महत्येचा प्रयत्न होतो.

नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या आकडेवारीवर आधारित स्टुडंट सुसाइड : ए स्प्रेडिंग एपिडेमिक इन इंडिया २०२४ च्या अहवालानुसार, दरवर्षी आत्महत्या २ टक्क्यांनी वाढत आहेत आणि धक्कादायक बाब म्हणजे विद्यार्थ्यांच्या आत्महत्येत ४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. जगात सर्वाधिक आत्महत्या भारतात होतात. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या अहवालानुसार, २०२२ मध्ये १७१,००० लोक आत्महत्येने मरण पावले, २०२१ च्या तुलनेत ४.२% आणि २०१८ च्या तुलनेत २७% वाढ नोंदवली गेली. आत्महत्येचे प्रमाण प्रति १ लाख १२.४ वर पोहोचले आहे, जे खूप जास्त आहे. २०२२ मध्ये देशातील १.७ लाख आत्महत्यांपैकी १३.३% आत्महत्यांसह, महाराष्ट्र राज्य हे देशाची आत्महत्या राजधानी म्हणून पहिल्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्र राज्याच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या अहवालानुसार, गेल्या वर्षी महाराष्ट्र राज्यातील २८५१ शेतकऱ्यांनी आर्थिक संकटामुळे आत्महत्या केल्या आहेत. २०२२ मध्ये ही संख्या २९४२ पर्यंत वाढली, तर २०२१ मध्ये ती २७४३ होती.

सरकारी अधिकाऱ्यांच्या चुका, निष्काळजीपणा आणि भ्रष्टाचारामुळे अनेक अपघात होतात, ज्यात नेहमीच जीवित व वित्तहानी होते, अशा अपघातात दरवर्षी मोठ्या संख्येने लोक मृत्युमुखी पडतात, तरीही हे दोषी अधिकारी गुन्हेगार असूनही पश्चातापाने पेटून उठत नाहीत आणि आत्महत्या करत नाहीत, मग छोट्या छोट्या गोष्टींवरून आपला संयम का सुटतो. माणसाच्या दुष्कृत्यांमुळे आज जगणे कठीण झाले आहे, कारण माणसाच्या लोभ आणि स्वार्थाने समस्या निर्माण केल्या आहेत. खोटा देखावा, लोकांकडून जास्त अपेक्षा किंवा खूप विश्वास, गर्व, मादक पदार्थांचे व्यसन, संस्कारांचा अभाव, वाईट संगत, शब्द आणि कृतीतील फरक, अनियंत्रित भावना, कठोर परिश्रमाचा अभाव, आळशीपणा, लवकर हार मानणे, समाधानाचा अभाव या सर्व मानवनिर्मित समस्या आणि व्यवहार आहेत, जे अतिरेक केल्याने अनेकदा मृत्यूचे कारण देखील ठरतात. जे संघर्ष करतात ते निश्चितच यश प्राप्त करतात आणि त्यांनीच जगात इतिहास रचला आहे, कारण त्यांनी संघर्ष करून आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे.

सकारात्मक ऊर्जेचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे आपल्या देशाचे नेते, प्रत्येक कठीण परिस्थितीत सकारात्मक विचार कसा ठेवायचा हे आपण त्यांच्याकडून शिकले पाहिजे. आपण निवडणूक जिंकलो किंवा हरलो, पक्षांतर, घोटाळ्याचे गंभीर आरोप किंवा आपल्यावरील खटले, तुरुंगात जावे लागले, मंत्रिपद सोडावे लागले, युती तोडावी लागली, प्रतिस्पर्ध्यांशी हातमिळवणी करावी लागली, काहीही असो पण नेतेमंडळी कायमच मानसिक ताण नियंत्रणात ठेवून कामे करतात. प्रत्येक परिस्थितीत नेते जनतेला सकारात्मक आश्वासने देत असतात. निवडणुकीच्या काळात, ते ऊन, पावसात सतत रॅली करतात, कमी झोप झाली असली तरीही सर्वसामान्यांप्रमाणे चिडचिड होऊ देत नाहीत. वाढत्या वयाचा त्याच्यावर फारसा परिणाम झालेला दिसत नाही, ते दररोज १२-१४ तास व्यस्त असतात. या सवयी, वागणूक, कठीण परिस्थितीतही सकारात्मकतेचा विचार करण्यासारख्या गोष्टी आपण सर्वांनी शिकल्या पाहिजेत.

उच्च मानवी धैर्य, चैतन्य आणि उत्कटतेचे अद्वितीय उदाहरण म्हणजे माउंटन मॅन दशरथ मांझी, बिहारच्या ग्रामीण भागातील एक अत्यंत सामान्य गरीब वृद्ध माणूस, ज्याने एकट्याने हातोडा आणि छिन्नीच्या सहाय्याने सलग २२ वर्षे डोंगरातून रस्ता कोरला. सुरुवातीला लोक त्यांना वेडा म्हणायचे, पण त्यांनी संपूर्ण जगात इतिहास रचला. ऊन, पाऊस, वादळ अशा प्रत्येक हवामानातील आव्हानांवर मात करून एका वृद्ध माणसाने अशक्य गोष्ट शक्य करून दाखवली. या २२ वर्षात त्यांना किती त्रास सहन करावा लागला असेल याचा विचार करा, पण त्यांचे ध्येय एकच होते, ते कधीही आपल्या ध्येयापासून भरकटले नाही, हिंमत हरले नाही. याला सकारात्मक विचारांच्या ऊर्जेची ताकत म्हणतात.




पॅरालिम्पिकमध्ये जगातील दिव्यांग खेळाडू आपले सर्वोत्तम कौशल्य दाखवून देशासाठी पदके जिंकून देशाचा गौरव करतात. स्टीफन विल्यम हॉकिंग सारख्या अनेक शास्त्रज्ञांनी आपल्या अपंगत्वाला कमजोरी बनू दिली नाही, नवनवीन शोध लावून इतिहास रचला. माणसाने स्वतःला कधीही कमकुवत समजू नये आणि कधीही खचून जाऊ नये. हे अनमोल आयुष्य शेवटच्या श्वासापर्यंत आनंदाने जगायचे आहे, प्रत्येक परिस्थितीत हसतमुखाने जगावे. संपूर्ण जगाची संपत्ती खर्च करूनही आपण क्षणभरही आयुष्य विकत घेऊ शकत नाही. अनमोल जीवनाची किंमत समजून घ्या. एक छोटीशी मुंगीही वारंवार अपयशी होऊनही प्रयत्न सोडत नाही, पराभव स्वीकारत नाही, पुन्हा प्रयत्न करून यश मिळवते, मग माणूस आत्महत्येसारखा गुन्हा का करतो?

जगात आपल्यापेक्षा जास्त संघर्ष करणारे खूप लोक आहेत. रागाच्या भरात किंवा आवेशात घाईघाईने कोणताही निर्णय घेऊ नका. आनंद किंवा भावनेच्या आहारी जाऊन कोणतेही वचन देऊ नका. कोणताही अयोग्य निर्णय घेण्यापूर्वी, त्याचे परिणाम, आपल्या प्रियजनांवर प्रभाव आणि भविष्याचा विचार करा. लोकांकडून जास्त अपेक्षा ठेवू नका, खोटेपणा टाळा, आपल्या मर्यादा ओळखा. लहानपणापासूनच मुलांना चांगले-वाईट, ज्येष्ठांचा आणि स्त्रियांचा आदर करणे, दुर्बलांना मदत करणे, अंमली पदार्थांपासून दूर राहणे, संस्कार, न्याय आणि एकता याविषयी शिकवले पाहिजे. निरोगी छंद जोपासणे, परोपकार, व्यायाम, निसर्ग आणि प्राण्यांबद्दल प्रेम, समाज आणि देशाप्रती नैतिक जबाबदारी, चांगल्या कारणांसाठी श्रमदान या गोष्टी आपल्याला समजूतदार सुजाण नागरिक आणि समाधानाभिमुख बनण्यास मदत करतात. अशा दिनचर्या आणि जीवनशैलीमुळे आपल्याला नेहमीच आनंददायी वातावरण मिळते, सकारात्मक विचारशक्ती वाढते, तणावमुक्त जीवन जगण्याचा हा सोपा मार्ग आहे.

● डॉ. प्रितम भि. गेडाम
prit00786gmail.com

पान १ वरून पुढे...

## गावागावात घोंगडी...

तुम्ही आरक्षण दिलं नाही तर मग मी राजकीय बोलणार असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला.

गावागावात घोंगडी बैठकीचे नियोजन करा असं सांगत मनोज जरांगे म्हणाले की, हे तीन महिने मराठ्यांचे अस्मितेचे आहेत भविष्याचे आहेत. लढाई माणूस केवळ बेसावध राहिल्यामुळे हरतो. उद्यापासून गावागावात २० पोरांची टीम तयार करा. ज्या गावात अशा टीम तयार होतील त्याच गावात घोंगडी बैठका होतील. गरीब मराठा सगळा बाजूला गेलाय. श्रीमंत मराठ्याला गरीब मराठा जमत नाही. आचारसंहिता लागण्यापूर्वी आठ दिवस आधी आपण बैठक घेवू आणि मग ठरवू की आपण निवडणूक लढवायची का नाही.

पुढे बोलताना जरांगे म्हणाले जातीयवादी आधिकाऱ्यांनी अंतरवाली सराटीमध्ये लेकरा-बायांना मारले. ज्यांनी मराठ्यांना मारले त्यांना तुम्ही बढती दिली हे समाज विसरणार नाही. समुद्रसारखी काँग्रेस गेली, तुम्ही गर्वात राहू नका. पोलीस लाठीचार्ज करतात, हल्ले करतात. हा जीवघेणा हल्ला फडणवीसांनी जाणून बुजून करवून आणला असा आरोप मनोज जरांगे यांनी केला.मराठ्यांचा तोल सुटला तर हे आमदार चटणीला पण उरणार नाही. मी मराठ्यांच्या पोरांना शांत राहायला सांगतोय. फडणवीससाहेब, एकदा का मराठा समाज रस्त्यावर उतरला की तुम्हाला जमिनीवर पण पाय ठेवू देणार नाहीत असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला.

पुढे ते म्हणाले भाजपचे नेते तर म्हणतात मी लई खुनशी आहे. मग भाजपचे नेते रात्रीच येतात आणि गोधडीमधून उठवतात आणि हे फडणवीस साहेबांना माहितीच नाही असं जरांगे म्हणाले. भाजपमधील इतकी लोक बाहेर आहेत की एकेदिवशी सगळेच आपल्याकडे येतील. तुम्ही एकदा पाडून ताकत दाखवली. मराठ्यांना हारू देवू नका असं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं.

## परळीतील प्रकल्पग्रस्तांचे..

उपमुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी सांगितले, प्रकल्पग्रस्तांच्यामुळे नवीन प्रकल्प उभारली जातात. त्यांचा विकासातील वाटा महत्वाचा आहे, त्यामुळे त्यांची सामजिक सुरक्षितता महत्वाची असून मंजुर आकृतीबंधाच्या ५०% पदे ही प्रकल्पग्रस्तांनासाठी असावीत असा निर्णय श्री फडणवीस यांनी बैठकीत घेतला. श्री बावनकुळे यांनी याबाबतची कार्यवाही लवकरात लवकर पुर्ण करावी अशा सुचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यासह परळी औष्णिक विद्युत केंद्रातील ९ व्या संचाबाबतही उपमुख्यमंत्री श्री फडणवीस यांच्यासोबत झालेल्या दूरदृश्य प्रणाली अंतर्गत झालेल्या बैठकीत सकारात्म्क चर्चा झाली.

# ताडसोन्ना आणि डुब्बाथडी येथील कार्यकर्ते राष्ट्रवादीत दाखल

**▶ विजयसिंह पंडित यांनी केले स्वागत**

गेवराई । प्रतिनिधी



गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे ताडसोन्ना आणि डुब्बाथडी येथील भाजपा- सेनेच्या असंख्य कार्यकर्त्यांनी विजयसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गटात जाहीर प्रवेश केला. यावेळी विजयसिंह पंडित यांनी त्यांचे स्वागत करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेवराई विधानसभा मतदारसंघात अमरसिंह पंडित आणि विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्धार करत भाजपा सेनेचे असंख्य कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गटात जाहीर प्रवेश करत आहेत. मौजे ताडसोन्ना येथील रोहित नाईकवाडे, श्रीकिसन चोले, विष्णू जायभाये, जितेंद्र घुगे, जयसिंग मुंडे, विशाल मुंडे, गोविंद मुंडे, संतोष कडळे आदींनी विजयसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. यावेळी राष्ट्रवादी किसान शेवटचे सुनिल पाटील, समीर शेख, श्रीकिसन कदम, महादेव गिराम, प्रमोद माने, उद्धव पैठणे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे काळेगाव - डुबाथडी येथील उपसरपंच गोविंद तौर , डूबाथडीचे योगेश तौर, माजी सरपंच बबलू तौर, विनायक तौर, सतिश तौर, भिस्मराज यादव, महादेव कदम, विष्णूपंत माने, महादेव तौर, संजय तौर, पंडितराव तौर, गोपाळ तौर आदींनी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये केला. विजयसिंह पंडित यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी बोलताना टाकरवनचे सरपंच सुनील तौर यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना विजयसिंह पंडित यांना आमदार करण्यासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वसुदेव बापुराव मिसाळ यांना लोकरत्न पुरस्कार जाहीर

बीड । प्रतिनिधी



वसुदेव बापुराव मिसाळ सा पोलीस उप निरीक्षक वाहतूक शाखा बीड यांना लोकशाही पत्रकार संघांचे राष्ट्रीय अध्यक्ष भागवत( बीबी ) वैद्य यांच्या शिफारस नुसार कुंभार समाज विकास सेवा भावी संस्था, बीड च्या वतीने दिला जाणारा उत्कृष्ट कार्याबद्दल लोकरत्न पुरस्कार जाहीर झाला असून त्यांचे सर्वत्र शुभेच्छा मिळत आहेत. त्यांनी त्यांच्या सेवा काळात बीड

वाहतूक शाखा येथे कार्यरत असताना अनेक शाळेमध्ये चंपावती विद्यालय, सरस्वती विद्यालय, भगवान विद्यालय येथे वाहतूक नियमांच्या बाबतीत मार्गदर्शन केले व रस्ता सुरक्षा च्या माध्यमातून तेथील गुणवंत विद्यार्थ्यांना माननीय जिल्हाधिकारी साहेब माननीय, पोलीस अधीक्षक साहेब यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा समारोपण निमित्त बक्षीस वितरण करण्यास सहभाग घेऊन चांगले काम केले. गरीब वाहन चालक यांच्याकडून नियम मोडला तर त्याला नियमाचे पालन केले पाहिजे याची जाणीव करून येथून पुढे नियम मोडणार नाही अशी कल्पना देत असतो. गेल्या वर्षी पो.स्टे. शिवाजी नगर येथे कार्यरत असताना गु. र. २७५/२२ मधील अथक प्रयत्न करून शहीद सुभाष सानप यांचे बंधू मोहन सानप यांचा सातत्याने आठ महिने तपास करून त्यांचा नोटरी करून पळवलेला ट्रक आम्ही शोध घेऊन त्यांना परत मिळून दिला कलम ४२० भा. द. वी.१३ लक्ष ४७ हजार किंमती चा ट्रक परत केला आहे. या त्यांच्या कार्याची दखल घेऊन लोकशाही पत्रकार संघांचे राष्ट्रीय अध्यक्ष भागवत (बीबी ) वैद्य यांनी वसुदेव मिसाळ यांना लोकरत्न पुरस्कार मिळून दिला आहे.

पान ४ वरून पुढे...

## आष्टीत पीएम कुसुम...

एकूण अन्नधान्यांमध्ये ४०% योगदान या सिंचित शेतीतून होत आहे..

केवळ पावसावर आधारित शेती आणि सिंचित शेती याची तुलना केल्यास सिंचित शेतीतून दुप्पट उत्पादन मिळू शकते तसेच शेतीची उत्पादन क्षमता वाढून पिकात वैविधता येते महाराष्ट्रात कृषी क्षेत्रापैकी ८० टक्के क्षेत्र पावसावर अवलंबून आहे आणि जवळपास ७० टक्के शेतकरी अत्यल्प अल्पभूधारक वर्गात मोडतात त्यांच्यासाठी विजेवर चालणारे पंप आणि डिझेल पंप याचा वापर होतो. परंतु महाराष्ट्रातील बहुतांशी शेती दुर्गम मागास भागात असल्यामुळे विजेद्वारे चालणारे पंप वापरण्यास अडचण निर्माण होतात तसेच वारंवार होणारी वीज कपात, वीज टंचाई, लोड शेडिंग मुळे शेतकरी हैराण असल्यामुळे केंद्र शासनाने शासनाने पीएम कुसुम सौर ऊर्जा योजना ही योजना सुरू केली असून त्यामध्ये ऑनलाईन पद्धतीने अर्ज करून नोंदणी करता येते लाभार्थी शेतकऱ्यास मंजुरीनंतर त्याच्या वाट्याची रक्कम भरावी लागते उर्वरित रक्कम केंद्र शासन कंपनीकडे भरत असते या ऑनलाइन पद्धतीमध्ये काम करणारे काही कंत्राटी कर्मचारी आणि काही वीज कर्मचारी यांनी संपूर्ण तालुक्यामध्ये मंजूर झालेले पंप दुसरे शेतकऱ्यांना रोख पैसे घेऊन विकण्याचे प्रकार घडलेले आहेत काही शेतकऱ्यांनी याबाबत विरोध केला असता कंपन्यांचे नेमलेले सगळे त्यांचे सहकारी यांनी लाभार्थी शेतकऱ्याला बंदुकीचा धाक दाखवून मंजूर पंप दुसऱ्या शेतकऱ्यांना रोख पैसे घेऊन विकल्याच्या घटना घडलेल्या आहेत पीएम कुसुम सौर घटक ब चे लाभार्थी असलेले तालुक्यातील केरूळ या गावचे शेतकरी राजेंद्र गोंदकर यांनी पोलीस स्टेशन मध्ये या गैरप्रकार बद्दल फिर्याद दाखल केली आहे आष्टी तालुक्यातील अनेक गावांमध्ये असे गैरप्रकार घडलेले आहेत कुसुम सौर योजनेचे महाराष्ट्र राज्यात काम करणाऱ्या ९ ते १० कंपन्या असून सर्व कंपन्यांनी खाली नेमलेले एजंट यांनी हा महा घोटाळा केल्याचे दिसून येत असून त्यांना काही वीज वितरण कंपनीचे कर्मचारी देखील सामील झाल्याचे बोलले जात आहे या सर्व प्रकाराची चौकशी करून गुन्हे दाखल करावेत अशी मागणी ही शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळा समवेत माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी केली आहे. शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे यासाठी केंद्र सरकार तसेच राज्य सरकारच्या वतीने शेतकऱ्यांना कृषि वापरासाठी कुसुम घटक ब योजना उपलब्ध करुन देण्यात आली.मात्र या योजनेच्या मूळ लाभार्थ्यांना याचा लाभ न होता यामध्ये संबंधित कंपनीचे डिस्ट्रीब्यूटर याने संगनमताने चिरीमिरी घेऊन इतरांना ते सोलर पंप देण्याचा सपाटा लावला असल्याने आष्टी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला असल्याने या मागे असलेल्या मुख्य सुत्रधारावर कायदेशीर गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करण्याची मागणी माजी मंत्री सुरेश धस यांनी केली आहे.

शेतकऱ्यांमध्ये सौर ऊर्जा निर्मितीला चालना देणे.शेतकऱ्यांना त्यांच्या शेतजमिनीवर सौर पंप आणि सौर ऊर्जा संयंत्रे लावण्यासाठी प्रोत्साहन ज्यामुळे त्यांचे पारंपारिक उर्जा स्त्रोतांवरील अवलंबित्व कमी होऊन शाश्वत कृषी पद्धतींना हातभार लावण्यासाठी पीएम-कुसुम योजना शेतकऱ्यांना लागू करण्यात आली.या योजनेअंतर्गत ३, ५ व ७.५ एच.पी क्षमतेचे सौर कृषिपंप ९० ते ९५ टक्के अनुदानावर उपलब्ध केले गेले.सौर कृषिपंपासाठी पात्र लाभार्थ्यांना पंपाच्या क्षमतेनुसार खुल्या प्रवर्गातील शेतक-यास १० टक्के आणि अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यास ५ टक्के लाभार्थी हिस्सा भारण्यासाठीचा असतो.या योजनेचा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरल्यानंतर संबंधित विभागामार्फत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना मेसेजच्या माध्यमातून कळविण्यात येते. त्यानंतर संबंधित लाभार्थी शेतकरी कोणत्या कंपनीचा सोलर घ्यायचा याची निवड करून संबंधित विभागाला कळवतो. तदनंतर सदर कंपनीचा डिस्ट्रीब्यूटर आणि महावितरणच्या वायरमनला पुढील ६० दिवसाच्या आत सौर पंप बसवणे अनिवार्य असते. मात्र यामध्ये आष्टी तालुक्यात मोठे गौडबंगाल उघडकीस आले असून यामध्ये संबंधित डिस्ट्रीब्यूटर आपल्या स्तरावरून लाभार्थ्यांपर्यंत हा सौर पंप न जाऊ देता याची परस्पर इतरांना विक्री करण्याचा प्रकार उघडकीस आला असून याबाबत अनेक शेतकऱ्यांनी सदरील कंपनी डिस्ट्रीब्यूटर यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया हातात घेतली असून यामध्ये आष्टी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप करत माजी मंत्री धस यांनी शेतकऱ्यांसह आष्टी पोलीस ठाणे तसेच महावितरण कार्यालयात धाव घेत याबाबत सखोल माहिती घेत संबंधितांवर तात्काळ गुन्हे दाखल करून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## शरद पवारांकडून...

सर्वे सुरू केले आहेत. त्यात पुजाताई मोरे यांचे देखील नाव आहे. त्यामुळे तुतारीच्या चिन्हावर उभे राहण्यासाठी पक्षाकडून पुजाताई मोरे यांना बळ दिले जात आहे. तरुण चेहरा, शेतकरी चळवळीतील चेहरा व विस्थापितातून नेतृत्व घडवण्याची शैली शरद पवार साहेबांकडे असल्याने निलेश लंके, भास्कर भगरे, बजरंग सोनवणे यांच्याप्रमाणे गेवराईतील घराणेशाहीच्या राजकारणाला फाटा देत पूजाताई मोरे यांच्या सारख्या चेहर्याला उमेदवारी दिल्यास नवल वाटायला नको, अशी चर्चा सर्वत्र ऐकायला मिळते आहे.

## बाळु जरांडे यांना आदर्श ..

अधिकारी प्रकाश पोळ, गटशिक्षणाधिकारी कैलास खैरे, सरपंच बाळासाहेब खैरे,स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे हे.कॉ. बबनराव मखरे, केंद्रप्रमुख राजेंद्र त्र्यंबके, केंद्रप्रमुख राम निकम, केशव गायकवाड, सुरेश मोहिते, केंद्रप्रमुख कुंभार, आदर्श शिक्षक एकनाथ चव्हाण, पांडुरंग मोहळकर, विश्वस्त मुकुंद सातपुते, चेअरमन संतोष राऊत, माजी चेअरमन नारायण राऊत, किसन वराट, संजय घोडके, बाबासाहेब कुमटकर, ज्ञानेश्वर कोळेकर, मल्हारी पारखे, नवनाथ बहीर आदींसह तालुक्यातील शिक्षक, शिक्षिका, सरपंच, ग्रा. पं. सदस्य व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

## अंबा नगरीत शिवसेनेचा...

निवडणुकीत बीड विधानसभेवर बाजीराव चव्हाण हे भगवा फडकवणारच असे मत देखील मंगेश चिवटे यांनी व्यक्त केले. माणसं खूप भेटतात पण माणुसकी जिवंत असलेले माणसे मिळणं दुर्मिळ झाल आहे. आणि असा माणुसकी जिवंत असलेला बाजीराव चव्हाण बिडकर यांच्या सेवेसाठी तत्पर आहे , त्यामुळे येणाऱ्या काळात तुम्ही बाजीराव चव्हाण यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहणे गरजेचे आहे असे देखील मंगेशजी म्हणाले. अडल्या नाडल्यांना मदत करताना शिवसेना कधीच जात धर्मपंथ पाहत नाही. माणुसकी हा धर्म आमचा म्हणत शिवसेना आणि शिवसैनिक लोकसेवेसाठी नेहमी तत्पर असतात . या कामगार मेळाव्याला शिवसेनेच्या प्रवक्त्या ज्योतीताई वाघमारे यांनी संबोधित करताना त्या म्हणाल्या की देवीचे दर्शन करण्यासाठी मंदिरातच जावं लागतं असं नाही , येथे उपस्थित असलेल्या प्रत्येक कामगार महिलेत मला देवीचे दर्शन झाले आहे . बीड जिल्ह्यामध्ये मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून अविरतपणे रुग्ण सेवा केल्याबद्दल ज्योतीताई वाघमारे यांनी बाजीराव दादा चव्हाण यांचे अभिनंदन व कौतुक केले. याप्रसंगी शिवसेना मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन देखील मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले व दिव्यांग बांधवांना कृत्रिम अवयवाचे वाटप करण्यात आले . या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने कामगार , महिला पुरुष, अपंग बांधव तसेच जिल्ह्यातील शिवसैनिक उपस्थित होते .

## शिक्षकदिनी आदर्श शिक्षक...

यंत्रणेच्या हलगर्जीपणामुळे रखडलेले आदर्श शिक्षक पुरस्काराचे तातडीने सन्मानपूर्वक द्यावे. जिल्हा परिषद बीड यांच्याकडुन जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये चांगले काम करणाऱ्या शिक्षकांना गेल्यावर्षी ११ प्राथमिक व १० माध्यमिक तर एक दिव्यांग शिक्षकाची निवड करण्यात आलेली होती.निवड प्रक्रिया वेळेत पूर्ण झालेली असतानाही पालकमंत्री आणि यंत्रणेला पुरस्कार वितरणासाठी वेळ मिळाला नसल्याचे बोलले जात आहे.परीणामी शिक्षक पुरस्कार वितरण होऊ शकले नाही.पुरस्काराचे वितरण रखडलेले आहे.यावर्षी शिक्षक दिनी पुरस्कार देण्यासाठी शिक्षण विभागाने जिल्हा शिक्षक पुरस्कारासाठी प्रस्ताव मागविले होते.यात ५६ प्रस्ताव जिल्हा परीषदेकडे आलेले आहेत तर सद्यस्थिती प्रस्तावांची पडताळणी सुरू झालेली असुन अजुन पोलिस प्रशासनाकडून चारित्र्य पडताळणी अहवाल येणे बाकी आहे.तिथुन पुढे हे प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे जाऊन त्यावर मोहर उमटणार आहे.या प्रक्रीयेस वेळ लागणार असुन तातडीने दि.१७ सप्टेंबर हैदराबाद मुक्ती संग्राम दिनाचा मुहूर्त साधून पुरस्कारांचे वितरण करण्यात यावे. दि.५ सप्टेंबर २०२४ शिक्षक दिनी देण्यात येणार नाहीत.शिक्षकदिनी गुरूजींना सन्मानापासुन वंचित ठेवणे हि बाब अशोभनीय असुन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड आणि शिक्षणाधिकारी ( प्राथमिक व माध्यमिक) जिल्हा परिषद बीड यांना तातडीने पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करून पुरस्कारांचे वितरण करण्यात यावे. शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचा भार वाढत असुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असुन आवश्यक उपाययोजना करण्यात यावी. जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये शिक्षकांच्या जागा रिक्त असल्याने शाळेतील कार्यरत शिक्षकांनाच अध्यापनासह ईतर शाळाबाह्य कामांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होत असुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. शिक्षण हक्क कायद्यानुसार जणगणना,प्रत्यक्ष मतदान आणि नैसर्गिक आपत्ती या व्यतिरिक्त कोणतीही अशैक्षणिक कामे शिक्षकांना देऊ नयेत असे बंधन असताना त्याचे पालन होत नसुन. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात १६४ मुद्यांची माहिती भरणे, फोटो अपलोड करणे,महावाचन उपक्रम पायाभूत चाचणीचे गुण ऑनलाइन करणे, मुलांचे आधार अपडेट करणे,, सरल पोर्टलची माहिती भरणे,रोजचा मध्यान्ह भोजन अहवाल,स्वयंपाकी मानधन देयक अहवाल,साक्षर निरक्षरांचे सर्व्हेक्षण करून एक्सेल मध्ये सॉफ्ट आणि हार्ड कॉपी देणे, विविध प्रकारच्या लिंक भरणे, अहवाल प वर टाकणे, विविध उपक्रम, केंद्रातील योजना आदी अशैक्षणिक कामांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होत असुन याबाबतीत आवश्यक उपाययोजना करण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली आहे.

धारूर तालुक्यातील पहाडी पारगाव जिल्हा परिषदेच्या शाळा बांधकामासाठी निधी द्यावा : डॉ.गणेश ढवळे- धारूर तालुक्यातील पहाडी पारगाव येथील जिल्हा परिषद शाळा इयत्ता पहिली ते आठवी पर्यंत असुन जवळपास १५० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या आहे.जिल्हा परीषद शाळेची जुनी ईमारत असुन दि.२ सप्टेंबर रोजी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे ३ वर्गखोल्या ढासळल्याने विद्यार्थ्यांना मारोती मंदिर व सभागृहात ज्ञानार्जन करावे लागत असुन तातडीने बांधकाम निधी देण्यात यावा.अशी मागणी करण्यात आली आहे.

## आरोग्य उपकेंद्र ह्विवरसिंग...

पुरूष,मधुमेह असणारे १८ वर्ष पूर्ण करणारे तरूण मंडळी, ज्या व्यक्ती तंबाखू,गुटखा व इतर व्यसन करत आहेत अशा सर्वांनी बी.सी.जी.लस घेण्यासाठी उपकेद्रांतर्गत कर्मचारी यांनी जाणीव-जागृती करून हिवरसिंगा गावातील नागरिकांना लस घेण्याचे अवाहन केले.त्या प्रमाणे नागरिकांचा उत्तम प्रतिसाद आहे.हा लसिकरण कार्यक्रम व ढइ संबंधातील तपासणी-उपचार उपकेद्रांतून करण्यात येणार.त्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी लसिकरण मोहीमेत सहभागी करण्यासाठी शिवराम राऊत, पांडूळे हे सहकार्य करतील. यावेळी यावेळी राधाकिसन दुधाळ,अंबादास शिंदे,काशिबाई दुधाळ,पार्वती शिंदे,संजिवनी शिंदे सह महिला पुरूष तरूण यांची उपस्थिती होती.

# माजी मंत्री बाबा सिद्दीकींची डॉ.योगेश क्षीरसागरांच्या संपर्क कार्यालयास भेट

▸ राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक सेलकडून सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा माजी मंत्री बाबा सिद्दीकी हे बीड जिल्ह्याच्या दौर्यावर सोमवारी (दि.९) आले होते. त्यांनी पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा डॉ. क्षीरसागर, अल्पसंख्याक सेल जिल्हाध्यक्ष इकबाल शेख यांच्यासह पदाधिकार्यांकडून सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना बाबा सिद्दीकी म्हणाले, मुंबईत विमानतळावर माझी आणि डॉ.योगेश क्षीरसागर यांची योगायोगाने भेट झाली. बीडमध्ये येत असल्याने त्यांनी माझे स्वागत केले. जिल्ह्यात माझे स्व.केशरकाकू, स्व.गोपीनाथ मुंडे यांच्याशी घनिष्ठ संबंध होते. त्यानंतर डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्याशी माझे संबंध राहिले. स्व.गोपीनाथ मुंडे यांचे मला कायम सहकार्य लाभले. पालकमंत्री धनंजय मुंडे हे आज लोकसभा निवडणुकीतील पराभवावरून नाराज दिसून आले. मी देखील माझ्या पराभवानंतर नाराज झालो होतो. परंतु त्यांची नाराजी आता मतदारांनी दूर करावी. राजकारणात कुणी कोणाचा मित्र-शत्रू नसतो. मुस्लिमांचे मतदान घेणार्या उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे ९ खासदार वक्फ बोर्डाच्या मुद्द्यावर सभागृहात गप्प राहिले, हे आपला वापर करतात हे अल्पसंख्याक समाजाने लक्षात घ्यायला हवे, सर्व समाजाला पुढे घेऊन जाण्याचा राष्ट्रवादी काँग्रेसचा विचार आहे. पक्षाच्या माध्यमातून जनहिताची कामे करू, असे सांगून डॉ.योगेश क्षीरसागर यांचे पक्षातील कार्य कौतुकास्पद आहे, त्यांना बीडकरांनी साथ द्यावी, असे आवाहन बाबा सिद्दीकी यांनी केले. यावेळी डॉ. सारिकाताई क्षीरसागर, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष इक्बाल शेख, अल्पसंख्यांक महिला जिल्हाध्यक्षा शाकेरा शेख, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष सपकाळ, माजी उपनगराध्यक्ष प्रा.किशोर काळे, ज्येष्ठ नगरसेवक सादेक जमा, सय्यद इलियास, जैतुल्ला खान, मुन्ना इनामदार, रवींद्र कदम, शुभम धूत, रणजित बनसोडे, अल्पसंख्यांक शहराध्यक्ष माजेद कुरेशी, नबील जमा, जि.प.चे माजी सदस्य ॲड.राजेंद्र राऊत, पं.स.चे माजी सदस्य अच्युत शेळके, माजी नगरसेवक रामसिंग टाक, नवगणचे संचालक आमेर सिद्दीकी, शारेक जकेरिया, शुभम कातांगळे, साजेद जागीरदार, समीर तांबोळी, बाबा खान, जावेद खान, जावेद शेख, ईसा चाउस, ए.वन.मुजीब, युनूस शेख, सादेक सिद्दीकी, विठ्ठल गुजर, वैभव मस्के, अच्युतराव रसाळ यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.





**● बाबा सिद्दीकी यांच्या अनुभवाचा पक्षाला फायदा: योगेश क्षीरसागर**

**बाबा सिद्दीकी यांच्या अनुभवाचा राष्ट्रवादी काँग्रेसला फायदा होणार आहे. त्यांनी बीड जिल्ह्यात संघटन मजबूत करण्यासाठी मार्गदर्शन करावे. पक्षापासून दुरावलेला मतदार जोडण्यासाठी त्यांचे प्रयत्न कामी येतील. त्यांनी शहरातील अल्पसंख्याक स्मशानभूमी, उर्दू घर आदी प्रश्नांची सोडणूक करण्यासाठी सहकार्य करावे अशी मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली.**

## मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी केंद्रीय गृहमंत्र्यांनी घेतले गणरायाचे दर्शन



**मुंबई । प्रतिनिधी**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी भेट देत गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गृहमंत्री शाह यांचे स्वागत केले. गृहमंत्री शाह यांच्या हस्ते गणपतीची आरती करण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते केंद्रीय गृहमंत्री शाह यांचे शाल, श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. तसेच त्यांना 'शासन आपल्या दारी' पुस्तकाची प्रत आणि गणपतीची मूर्ती भेट म्हणून देण्यात आली. मुख्यमंत्र्यांच्या स्नुषा वृषाली शिंदे यांनी गृहमंत्री शाह यांचे औक्षण करीत स्वागत केले. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, आमदार चंद्रशेखर बावनकुळे, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी गृहमंत्री शाह यांनी मुख्यमंत्री शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, स्नुषा वृषाली यांच्याशी संवाद साधला.

## आई - वडिलांपैकी केवळ एकाच पालकाकडे राहण्याची मुलाची इच्छा एकमेव निकष असू शकत नाही: हायकोर्ट

**बीड । प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलांच्या ताबा देण्यासंदर्भात संदर्भात निर्णय घेतांना पालकांपैकी केवळ एका पालकाकडे राहण्याची मुलाची इच्छा हा एकमेव निकष असू शकत नाही असे महत्त्वपूर्ण मत उच्च न्यायालयाने नोंदवले आहे. या प्रकरणात न्यायालयाने मुलांचा ताबा मागणाऱ्या वडिलांची याचिका फेटाळून लावली. याप्रकरणी आईतर्फे विधिज्ञ सय्यद तौसीफ यासीन यांनी बाजू मांडली. आपल्या अल्पवयीन मुलांचा ताबा पतीकडून काढून स्वतः कडे मिळवण्याकरिता आईने कौटुंबिक न्यायालय औरंगाबाद येथे अर्ज दाखल केला होता. कौटुंबिक न्यायालयाने वय दोन आणि पाच वर्षाच्या दोन अल्पवयीन मुलांना न्यायालयीन आदेशाद्वारे आईच्या ताब्यात दिले. सदर आदेशाच्या नाराजीने मुलांच्या वडीलाने उच्च न्यायालयात अपील दाखल केले. वडीलांमार्फत मुख्य युक्तिवाद करण्यात आले की, मुलांना त्यांच्या वडीलांसोबत राहण्याची इच्छा आहे व वडील मुलांची साभाळ करण्यास आर्थिक दृष्ट्या सृक्षम आहे. प्रकरणाची सुनवाई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती किशोर संत यांच्यासमोर झाली असता न्यायालयाने वडीलांची याचिका फेटाळून लावत अल्पवयीन मुलांच्या ताब्यासंदर्भात निर्णय घेतांना पालकांपैकी केवळ एका पालकाकडे राहण्याची मुलाची इच्छा हा एकमेव निकष असू शकत नाही व त्या आधारावर निर्णय घेता येणार नाही.

## जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी घेतायत संगणकाचे धडे



**आष्टी । प्रतिनिधी**

समग्र शिक्षा अंतर्गत राज्यातील २२७३ शाळेमध्ये संगणक प्रयोगशाळा स्थापित केल्या असून प्रत्येक शाळेवर या संगणक प्रयोग शाळेसाठी एक इन्स्ट्रक्टर सुद्धा रुजू करण्यात आलेले आहे, आधुनिक काळात टिकायचे असेल तर संगणकाशी मैत्री करावी लागेल व ते शिकावं पण लागेल हे उद्दिष्ट समोर ठेवून, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई ,राज्य प्रकल्प संचालक श्रीमती आर विमला मॅडम यांनी आयसीटी (इन्फॉर्मेशन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी)हा उपक्रम राबविण्याचे योजिले आहे. यामध्ये बीड जिल्ह्यातील १०१ शाळेमध्ये हा उपक्रम चालु असुन, अतिशय चांगल्या प्रकारचा उपक्रम राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई, श्रीमती. आर विमला मॅडम यांच्या सुचनेप्रमाणे व बीड जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी श्री.भगवान फुलारी सर (प्रा.) यांच्या मार्गदर्शनाने राबविण्यात येत आहे, तर येणाऱ्या काळात या उपक्रमाचा विद्यार्थ्यांना निश्चित फायदा होणार आहे.

## पाय घसरून तलावात पडलेल्या भाविकाचा १२ तासानंतर सापडला मृतदेह

**कडा । प्रतिनिधी**

सावरगाव येथे दर्शनासाठी आलेला एक भाविक अंघोळीसाठी गेल्यानंतर पाय घसरून तलावात पडल्याने बुडाल्याची घटना रविवारी सकाळी ६ वाजता घडली होती. पोलिसांना पैठणच्या गोताखोर पथकच्या सहकार्याने १२ तासांच्या अथक प्रयत्नानंतर मृतदेह सापडण्यात यश आले. रविंद्र आबासाहेब इंगळे असे मृत भाविकाचे नाव आहे. अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यातील दहिगाव बोलका येथील रविंद्र आबासाहेब इंगळे (३२) हा शनिवारी गावातील दिंडीसह आष्टी तालुक्यातील सावरगाव येथील मच्छिंद्रनाथ देवस्थान मायंबा येथे दर्शनासाठी आला होता. रविवारी सकाळी सहा वाजेच्या दरम्यान दोन मित्रांसह जवळच असलेल्या एका तलावावर तो अंघोळीसाठी गेला होता. अचानक पाय घसरून तो तलावात पडला. पोहता येत नसल्याने रवींद्र पाण्यात बुडाला. हा प्रकारे सोबत असलेल्या मित्रांनी दिंडीप्रमुख व देवस्थान विश्वस्त समितीला सांगितल्यानंतर बचाव कार्य सुरू झाले. माहिती मिळताच अंभोरा पोलिस घटनास्थळी दाखल झाले.अनेकांनी शोध घेण्याचा प्रयत्न केला पण शोध लागला नसल्याने पैठण येथील गोताखोर पथकाला पाचारण करण्यात आले. तब्बल १२ तासानंतर बुडालेला मृतदेह बाहेर काढण्यात पैठणच्या पथकाच्या सहकार्याने पोलिसांना यश आले.

## आ.क्षीरसागरांनी स्वत: उभे राहून शहरात स्वच्छता करवून घेतली

### कंत्राटदाराचे बिल आणि कर्मचाऱ्यांचे वेतन रखडल्याने थांबले होते काम

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात मागील काही दिवसांपासून स्वच्छतेचा आणि कचर्याचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करत होता. यावर आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासकीय स्तरावरून यामागील कारण शोधून त्यावर तोडगा काढला तसेच सोमवारी (दि.९) रोजी स्वतः रस्त्यावर उभे राहून शहरात स्वच्छता करवून घेतली. यावेळी, येत्या आठ दिवसांत शहरातील स्वच्छता मोहीम पूर्ववत होईल व येत्या दोन ते दिवसांपासून शहरांमध्ये घंटागाडी नियमितपणे कार्यरत होणार असल्याची माहिती आ.क्षीरसागर यांनी दिली.



सध्या गणेशोत्सव तसेच विविध सण-उत्सवांचा काळ आहे. परंतु यातच बीड शहरात गेल्या अनेक दिवसांपासून स्वच्छता होत नव्हती. तसेच कचरा उचलला जात नव्हता. त्यामुळे शहरात स्वच्छतेचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करत होता. यावर आ.संदीप क्षीरसागर यांनी यामागील कारण जाणून घेतले. दरम्यान, नगरपरिषदेच्या माध्यमातून ज्या कंत्राटदाराला स्वच्छतेचे काम देण्यात आले होते. त्या कंत्राटदाराचे बिल मागील सात महिन्यांपासून थकले होते. परिणामी स्वच्छता कर्मचाऱ्यांचे वेतन गेल्या अनेक महिन्यांपासून रखडले होते. त्यामुळे बीड शहरात स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला होता. यावर आ.क्षीरसागर यांनी शहरातील स्वच्छतेचा प्रश्न निकाली लागावा यासाठी मा.जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून नगरपरिषद व कंत्राटदाराची संयुक्त बैठक घडवून आणत तोडगा काढला. आ.संदीप क्षीरसागर यांच्या पुढाकाराने बीड शहरातील स्वच्छतेचा प्रश्न मार्गी लागला आहे. सोमवारी (दि.९) रोजी आ.क्षीरसागर यांनी स्वतः उभे राहून स्वच्छता करवून घेतली. तसेच पुढील आठ दिवसांमध्ये शहरात स्वच्छतेची मोहीम पूर्ववत झालेली असेल आणि येत्या दोन-तीन दिवसांपासून शहरात नियमित घंटागाडी कार्यरत होतील असे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले.



*बीड शहर पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक श्री. शितल कुमार बल्लाळ यांच्या हस्ते... आनंदग्राम च्या महागणपती ची आरती करण्यात आली या वेळी बच्चे कंपनी.*

## हो धनु भाऊ ही चूक आम्ही केली, पुढे पण करणारच: खुर्शीद आलम



काल झालेल्या भाजप प्रणित राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या अल्पसंख्यांक मेळाव्यात आपण अल्पसंख्यांक समाजाला उद्देशून खास करून मुस्लिम समाजाला सांगितलं की आम्ही लोकसभेला चूक केली पंकजा ताई ला मतदान केले नाही .. हो नाही केलं आणि कदापि करणार नाही आणि ही चूक आम्ही आणि बीड जिल्ह्याचा नव्हे तर अख्ख्या भारताचा इमानदार बहाद्दर आणि गैय्युर मुस्लिम समाज एक वेळा नाही तर शंभर वेळा ही चूक करणार,

कारण आमचं ताईशी काही वैर नाही पण ताई ज्यापक्षाकडून निवडणूक लढवीत होत्या त्या भाजपा पक्षाशी आमचं राजकीय वैर आहे, कारण सांगायची गरज नाही मुस्लिम समाज काय अख्ख्या भारताला माहीत आहे की भाजप जी काय पॉलिसी आहे, आज पर्यंत आम्ही गुजरात ची दंगल विसरू शकलो नाही,मुस्लिम समाजाचा घरं जाळण्यात आली,आमच्या आई बहिणीवर बलात्कार करून त्यांना जिवंत जाळण्यात आले. गर्भवती आई च्या पोट चिरून त्याचं अर्भक तलवारीवर नाच्वण्यात आलं, बिल्कीस बानू बलात्कार प्रकरणात दोषींना सोडुन त्या पापी लोकांचा मुस्लिम समाजाच्या नाकावर टिच्चून जागोजागी सत्कार करण्यात आलं हार तुरे देऊन गौरवण्यात आले,गौरक्षकच्या नावाखाली हजारो तरुणाची हत्या करण्यात आली, ही गोष्ट मुस्लिम समाज कदापि विसरणार नाही,आमच्या धार्मिक विषयात लुळबुळ करण्यात येत आहे तीन तलाक असो, समान नागरिक कायदा (उ,छठउ) असो वक्फ बोर्ड असो,

आणि आमच्या प्रेषित मोहम्मद सल्लालाहू अलाईहोसल्लम बद्दल गरळ ओकनाऱ्या रामगिरी महाराज ला तुमचा मुख्यमंत्री स्टेज वर जाऊन पाठिंबा देतो, आणि तो तुमचा टील्लिया नितेश राणे मुस्लिमांना मशिदीत घुसून मारण्याची भाषा करतो, त्यावेळेस नाही आठवत तुम्हाला मुस्लिम समाज , त्याचं साधं निषेध करण्यासाठी तुमची जीभ काय घशात पडली होती की काय. ते मूठ भर लोक तुमचे बगलबच्चे स्वतःला मुस्लिम समाजाचे नेते मिरवून घेत आहे आणि त्यांना दिवसा आमदार झाल्याचे स्वप्न पडत आहे, जे स्वतःच्या फायद्यासाठी मुस्लिम समाजाला भाजप च्या दावणीला बांधण्याचा प्रयत्न करत आहे,

ज्यांना आमदारकीचा गाजर दिलं ना तुम्ही ते ऐकतील तुमचं, पण हा बीड जिल्ह्याचा बहाद्दर मुस्लिम समाज ,भाजपा च्या मांडी ला मांडी लावून बसलेल्या तुमचं आणि तुमच्या अजित पवारांच्या राष्ट्रवादी ला कधी ही भीक घालणार नाही, आणि ते मुस्लिम समाजाचे मुंबई चे नेते ज्यांनी काँग्रेस शी गद्दरी करून भाजप चा मित्र पक्षासोबत घरोबा करून इथ येऊन सांगतात की मी अजित दादकडून अल्पसंख्यांक समाजाला सत्तेत भागीदारी मागणार , वाह रे नेते भागीदारी आणि कुणासोबत त्या मुस्लिम द्वेशी भाजपा सोबत, सिद्दीकी साहेब एवढंच तुमचं दादा ऐकत असतील तर त्यांना सांगा की मुख्यमंत्री ला सांगून त्या रामगिरी महाराज आणि नितेश राणे ला मुस्लिम समाजाबद्दल आणि आपल्या प्रेषित मोहम्मद सल्लालाहु आलय व सल्लम बद्दल प्रक्षोभक विधान केल्याबद्दल अटक करायला सांगा, उगच भाजपा च्या सांगण्यावरून कोणते ही मुस्लिम अल्पसंख्यांक समाजाचे मेळावे घेऊन काही फायदा होणार नाही आपल्या ह्या भुलथापाला बीड जिल्ह्याचा मुस्लिम समाज बळी पडणार नाही आणि येणाऱ्या विधान सभेच्या निवडणुकीत हा मुस्लिम समाज मताची भीक घालणार नाही, आणि ठणकावून सांगतो की जी चूक आम्ही लोकसभेला केली तीच चूक आम्ही विधानसभेला सुद्धा करणार आणि एक वेळेस नाही तर शंभर वेळा तीच चूक करणार आणि भाजप प्रणित महायुती ला बीड चा बहाद्दर मुस्लिम मतदार कदापि मताची भिक घालणार नाही.

**जाहीर प्रगटन**

**मा. श्री. ए. एस. जगताप, दिवाणी न्यायाधिश क. स्तर, शिरुर का. यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. १८२ / २०२४**

**कडुबाई व ईतर विरुध्द निल**

**ॲड. एच. एस. कोठुळे यांच्यामार्फत**

**अर्जदार –** १) कडुबाई भ्र. रावसाहेब चांदणे वय ७५ वर्षे, धंदा घरकाम, रा. आनंदगाव, ता. शिरुर (का), जि. बीड. २) केरु पि. रावसाहेब चांदणे वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा. सदर. मो. नं. ९०२२४४०१२८. ३) चंद्रकांत पि. रावसाहेब चांदणे वय ४७ वर्षे, धंदा शेती, रा. सदर. ४) कमळ भ्र. सुदाम पवळ वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. औरंगपुर, ता. शिरुर का., जि. बीड,

**विरुध्द निल**

**अर्ज –** बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

जि. बीड, यांचा ज्यापेक्षा **मयत नामे रावसाहेब पि. यादव चांदेणे, रा. आनंदगाव, ता. शिरुर का., मृत्यु दिनांक दि. २२/०३/२०२४ रोजी आनंदगाव, ता. शिरुर का., जि. बीड,** येथे मयत झाले असुन अर्जदार क्र. १ हि मयताची पत्नि असुन अर्जदार क्र. २ व ३ हे मुले असुन अर्जदार क्र. ४ हि मयताची विवाहीत मुलगी आहे. तसेच अर्जदार हे उपरोक्त मयताचे कायदेशीर वारस आहेत, असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा अर्जदार हे उपरोक्त मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे सदरहु तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०४/०९/२०२४ रोजी माझ्या सहिने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारीख – २३ /०९/२०२४**

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत)
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिरूर**

शिक्का

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

## रीजेन्सी पार्कच्या राजाच्या आगमनाने सोसायटीत सर्वत्र उत्साह आणि जल्लोष संचारला

**बीड । प्रतिनिधी**

गणेशोत्सव २०२४ निमित्त रेजेंसीपार्क बीड या सोसायटीमध्ये गणपती बाप्पाचे आगमन मोठ्या थाटामाटात झाले. अगदी पाच सहा वर्षांच्या मुलांनी सुरू केलेला हा गणेशोत्सव आता आठव्या वर्षात पदार्पण करत आहे. यावेळी सोसायटीतील सर्व महिला पुरुष लहान मुलं उपस्थित होते. हा गणेशोत्सव सोसायटीतील असला तरी अगदी मोठ्या मंडळाप्रमाणे येथील सर्व कार्यक्रम होतात. मुलांसाठी महिलांसाठी निरनिराळ्या स्पर्धा घेतल्या जातात जेणेकरून सोसायटीतील मुलांना या उत्सवाचे आकर्षण राहावे आणि गणेशोत्सवाला सांस्कृतिक जोड लाभावी यामध्ये रांगोळी, मेहंदी ड्रॉइंग, गाणे ,डान्स, गणपती बाप्पाची माहिती देणे , निबंध अशा स्पर्धा घेतल्या जातात.




एकूणच गणेशोत्सवाचे दहा दिवस म्हणजे सोसायटीसाठी मोठा सणच असतो. दररोज महाआरती होते.यावर्षी गणपतीबाप्पा ला महा नैवद्य म्हणून छप्पन भोग दीले जाणार आहेत.शेवटी बक्षीस वाटप आणि महाप्रसाद आयोजन केले जाते.या गणपती मंडळाचे सदस्य राज सानप , सिद्धू जमकर,अशोक मोरे,संकेत शिंदे,वरद परळीकर, पियूष साळवे,राज बिजेलवाड, आदित्य गायकवाड, अर्णव मोराळे, सार्थक तिडके, शौर्य फड,यश फड,रियांश मुंडे,अथर्व अमृळे, इत्यादी मिळून मेहनत घेऊन हा उत्सव यशस्वीपणे पार पाडतात.

Aditya Education Trust's
**Aditya College of MBA**

Sarda Estate Nalwandi Road, Beed - 431 122.
DTE Code 2104
Approved by AICTE New Delhi, DTE Mumbai,
Govt. of Maharashtra & Affiliated to Dr. BAMU Aurangabad.
Contact: 9028060254 Email ID: aditya7mba@gmail.com

Applications are invited from eligible & interested candidates for MBA Admission to First Year at Institute Level for Vacant Seats after CAP Round.

**Schedule of Activities**

| Sr.No. | Activities | Schedule |
|---|---|---|
| 1 | Registration Start | 10/09/2024 |
| 2 | Display of Merit List | 10/09/2024 Till 03:00 pm |
| 3 | Commencement of Admission | 10/09/2024 03:30 pm onwards |

If any seat remains vacant additional round will be conducted & schedule will be displayed on College Notice Board. Eligibility as per rules & regulations prescribed by State Common Entrance Test Cell Mumbai and Government of Maharashtra.

Director

**टी.सी. हरवला आहे.**

शिंदे बाळू रमेश या नावाचा इयत्ता १२ वी पासाचा टी.सी. बीड ते नाथापूर बस प्रवासामध्ये हरवला आहे. सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

संपर्क मो.न. ९५११३५११५२१

दैनिक मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
बीड । परभणी । छत्रपती संभाजीनगर । जालना । लातूर । धाराशिव । हिंगोली । नांदेड । नगर
● जिल्हा विशेष ● मंगळवार, दि. १० सप्टेंबर २०२४ ● पान ४







# आष्टीत पीएम कुसुम सौर ऊर्जा पंप योजनेमध्ये

# सब एजंटांनी केला कोट्यावधी रुपयांचा घोटाळा..?

- बंदुकीचा धाक दाखवून मंजूर पंप रोख स्वरूपात दुसर्याला विकले ?
- माजी राज्यमंत्री सुरेश धस यांची चौकशीची मागणी... आष्टी पोलिसात तक्रार दाखल..

**आष्टी । प्रतिनिधी**

पीएम कुसुम सौर योजना हा भारत सरकारचा उपक्रम असून शेतकऱ्यांमध्ये सौर ऊर्जा निर्मितीला चालना देऊन त्यांच्या जमिनीवर सौर पंप आणि सौर ऊर्जा संयंत्र बसवून वारंवार होणारी वीज कपात वीज टंचाई आणि लोड शेडिंग ची समस्या यावर उपाययोजना म्हणून केंद्र शासनाने पीएम कुसुम सौर ऊर्जा योजना कार्यान्वित केली आहे..

मात्र या कंपन्यांनी नेमलेले सब एजंट आणि त्यांचे सहाय्यक यांनी या योजनेमध्ये कोट्यवधी रुपयांचा घोटाळा केला असून काही लाभार्थ्यांच्या नावे मंजूर झालेले पंप रोख पैसे घेऊन दुसऱ्या शेतकऱ्यांना विकले आहेत विरोध करणाऱ्या लाभार्थ्यांना काही सब एजंटांच्या सहकाऱ्यांनी बंदुकीचा धाक दाखवल्याच्या देखील घटना घडलेल्या आहेत.. या सर्व प्रकरणाची आणि आर्थिक घोटाळ्यातील सहभागी असणारे यांचा शोध घेऊन त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत.. अशी मागणी माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी आज पोलीस स्टेशन आष्टी येथे जाऊन केली आहे..

या योजनेचे लाभार्थी राजेंद्र गोंदकर यांनी या प्रकरणी आष्टी



पोलीस स्टेशन येथे रीतसर फिर्याद दाखल केली आहे.. याविषयीचे सविस्तर वृत्त असे की,

शेती सिंचनासाठी पाण्याची नितांत गरज असून जगभरात एकूण लागवडीखालील जमिनीच्या २०% शेती सिंचन पद्धतीने केली जाते असून या संचित शेती तून जगभरात उत्पादित

● पीएम कुसुम सौर योजनेचे लाभार्थी यांना ऑनलाइन पद्धतीने मंजुरीचे मिळालेले पत्र आणि त्यांच्या मंजुरीचे सौर यंत्र दुसऱ्या शेतकऱ्याकडे बसवले असल्याबाबतचा प्राथमिक पुराव्या बाबतचे कागदपत्र मागवले आहेत तपासणी नंतर लगेचच गुन्हा दाखल करण्यात येईल.– सोमनाथ जाधव, पोलीस निरीक्षक (पोलीस स्टेशन आष्टी)

(उर्वरित पान २ वर)

## बाबाजी प्रतिष्ठान गणेश मंडळाचे उत्साहात गणरायाचे आगमन



**आष्टी । प्रतिनिधी**

गेल्या बारा वर्षांची परंपरा असलेल्या बाबाजी गणेश प्रतिष्ठान मंडळाच्या गणरायाचे उत्साहात आगमन झाले. याबाबत अधिक माहिती अशी की बाबाजी प्रतिष्ठान गणेश मंडळ आयोजित श्री. गणरायाची प्राणप्रतिष्ठा मंडळाचे अध्यक्ष अभय राजे धोंडे व चेअरमन राजेंद्र धोंडे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी भाजपा युवा मोर्चा बीड जिल्हा सरचिटणीस डॉ. अजयदादा धोंडे, सरपंच अभय गर्जे, सरपंच दादासाहेब जगताप, उपाध्यक्ष शेख आस्ताक भाई, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. बी. राऊत, प्रा. शिवदास विधाते, चेअरमन अरुण सायकड, उमेश शिंदे, इजि. पि. बी.बोडखे, यांच्यासह मंडळाचे सर्व पदाधिकारी व गणेश भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सावता गणेश मंडळात भव्य रक्तदान व आरोग्य शिबिराचे आयोजन



**बीड । प्रतिनिधी**

सावता गणेश मंडळ, श्री संत सावता माळी चौक यांच्या वतीने आज भव्य रक्तदान व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात २०० रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली, ज्यामध्ये नेत्र तपासणी, दंत तपासणी आणि सर्वसाधारण आरोग्य तपासणीचा समावेश होता. या शिबिरात प्रमुख डॉक्टरांची उपस्थिती होती. डॉ. अमोल सुनावत, डॉ. सचिन गायकवाड, डॉ. रमणकुमार बियाणी, डॉ. श्रद्धा बियाणी यांनी आरोग्य तपासणी केली. नेत्र तपासणीसाठी बी ऑप्टॉम अनिकेत अहिराव, बी ऑप्टॉम समर्थ राऊत, आणि बी ऑप्टॉम रोहिणी चौधरी यांनी विशेष योगदान दिले. समता फाउंडेशन, मुंबई जिल्हा रुग्णालय बीड, अरिहंत होमिओ क्लिनिक, आणि बियाणी मल्टी स्पेशलिस्ट क्लिनिक यांनी या शिबिरात मोलाचे सहकार्य केले.

## आरोग्य उपकेंद्र हिवरसिंगा येथे बी.सी.जी.लसिकरण



**शिरूर । प्रतिनिधी**

२०२५ पर्यंत भारत देशाला ढइ मुक्त करण्यासाठी इउत्र मोहिमे अंतर्गत आरोग्य विभागाच्या वतीने हिवरसिंगा आरोग्य उपकेंद्र येथे १) ६० वर्षा वरील सर्व व्यक्ती, १८ वर्षवरील मधूमेह असणारे तसेच व्यसनाधिनता मध्ये असणारे नागरिकांसाठी BCG चे लसिकरण कार्यक्रम संपन्न झाला.या लसिकरण मोहिमेचे उद्घाटन डॉ.अंजली बारगजे (सी.एच.ओ.) जेष्ठ नागरिक श्री.सुर्यकांतराव शिंदे, श्री.नवनाथ बडे, श्री.शिवराम राऊत, श्री.रामेश्वर पांडुळे, तसेच श्री.एस.आर.शिंदे (आरोग्यसेवक) सिस्टर शेख.वाय.एन.(NM) आशा सेविका, सौ.इंगळे ताई, सौ.झगडे ताई.यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी ६० वर्षा वरील सर्व जेष्ठ महिला– (उर्वरित पान २ वर)

## धोंडे ,धस, दरेकर, आजबे यांनी मतदारसंघ ओरबाडुन खाल्ला

## आष्टी - पाटोदा- शिरूर मतदारसंघाला नवा पर्याय हवा

### विकासासाठी विधानसभेची निवडणूक तुतारी चिन्हावर लढणार : प्रा सुशिला मोराळे

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी मतदारसंघात ४० वर्षापासून आष्टी मतदार संघाचे राजकारण धोंडे, धस, दरेकर, आजबे या चार घराण्या भोवती फिरत आहे परंतु त्यांच्याकडे विकासाचे व्हिजन नाही त्यांच्या भूलथापांना जनता कंटाळली आहे. मतदारसंघाच्या विकासासाठी विधानसभा निवडणुक रिंगणात उतरुन खा. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून निवडणूक लढविणार असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट)च्या प्रवक्त्या प्रा. सुशिला मोराळे यांनी पत्रकार परिषदेत केले.

गेल्या महिनाभरापासून विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सुशीला मोराळे यांनी जनसंवाद दौरा सुरु केला आहे. त्या अनुषंगाने रविवार दि.९ सप्टेंबर रोजी आष्टी तालुक्यात आले असता सायंकाळी ६ वाजता आष्टी येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत मोराळे बोलत होत्या. पुढे



बोलतांना त्या म्हणाल्या, गेल्या ४५ वर्षात या मतदारसंघाने २० वर्ष भिमराव धोंडे, १५ वर्ष सुरेश धस व पाच–पाच वर्ष दरेकर आणि आजबे यांनी आमदारकी भोगली आहे. आमदारकीची माळ गळ्यात पडल्यानंतर ते विकासापासून कोसो दूर आहे. आष्टी मतदारसंघ त्यांनी ओरबाडून खाल्ला आहे. या मतदारसंघांमध्ये एमआयडीसी उपलब्ध नाही मुख्य रस्त्यांची दुरवस्था आहे. ग्रामीण भागामधील रस्त्यांची बिकट अवस्था आहे तसेच सर्वसामान्यांच्या हाताला काम मिळेल असा एकही मोठा उद्योग या मतदारसंघांमध्ये गेल्या ४० वर्षापासून येऊ शकला नाही. त्यामुळे या चारही नेत्यांना मतदार संघातील जनता यावेळेस धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही. मतदार संघात आमदारकीचा नवा पर्याय नव्हता. मी सुरुवातीपासून भारतीय जनता पार्टीच्या विरोधात असल्याने आमदारकीच्या रिंगणात अद्याप उतरले नाही परंतु शरदचंद्र पवार साहेब यांच्या पक्षाची विचारधारा मला मान्य असल्याने खा. शरद पवार यांच्या आदेशाने आष्टी मतदारसंघाची निवडणूक लढविणार असून विजयी होणार असल्याचा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला. आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील अनेक गावांमध्ये त्यांच्या दौऱ्याला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे प्रा. मोराळे निवडणुकीसाठी सक्रिय झाल्याने आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघात चुरस निर्माण होणार आहे.

## बाळु जरांडे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

**जामखेड । प्रतिनिधी**



तालुक्यातील पाडळी येथील पवार वस्ती शाळेचे शिक्षक बाळु गंगाराम जरांडे यांना जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. येथील शिक्षक बाळु जरांडे हे पवारवस्ती (पाडळी) शाळेत सन २०१८–१९ पासून कार्यरत आहे. त्यांच्या प्रयत्नामुळे शाळेचा पट दहावरून ३५ वर गेला आहे. शाळेचा निकाल दरवर्षी १००% लागतो. जरांडे यांच्या या कामाची दखल घेऊन त्यांची आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड झाली आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल कर्जतचे उपविभागीय पोलीस अधिकारी विवेकानंद वाखारे, पुणे महानगर पालिकेचे माजी शिक्षण अधिकारी काळे, बीड माध्यमिक जिल्हा शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे, अहमदनगर उपशिक्षणाधिकारी बाळासाहेब धनवे, जामखेड गटविकास (उर्वरित पान २ वर)

## शरद पवारांकडून पुजाताई मोरेंना आशीर्वाद

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघात शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून किसान सेलच्या प्रदेशाध्यक्ष पुजाताई मोरे यांनी प्रमुख दावेदारी केली आहे. त्यांनी आतापर्यंत जवळपास दीडशे गावात आपला पहिल्या टप्प्याचा संवाद दौरा पूर्ण केला आहे. काल त्यांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेऊन मतदारसंघातील विविध प्रश्नांबाबत चर्चा केली. यावेळी पवारांनी पुजा मोरे यांना आशीर्वाद देत लढण्यासाठी नवी ऊर्जा दिली आहे. या भेटीचा फोटो पुजाताई मोरे यांनी आपल्या फेसबूवर पोस्ट केला आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघात प्रत्येकवेळी पवार–पंडित घराण्यात लढत होते. पण ही लढाई नेहमीच लुटूपुटूची असते. राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर शरद पवार गटाला गेवराईत शेतकरी चळवळीत काम करणार्या पुजाताई मोरे यांनी साथ



दिली. पवारांनी देखील पुजाताईंवर विश्वास टाकत त्यांच्यावर पक्षाच्या किसान सेलची राज्यस्तरीय जबाबदारी दिली. त्यामुळे तरुणांना संधी देण्याच्या दृष्टिकोनातून त्यांना अल्पावधीतच ही ताकद दिल्याचे स्पष्ट झाले. लोकसभा निवडणुकीत पुजाताई मोरे यांनी खा. बजरंग सोनवणे यांच्यासाठी जीवतोड मेहनत घेतली. याची दखल पक्ष नेतृत्वाकडून देखील घेण्यात आली आहे. पक्षाने प्रत्येक मतदारसंघात (उर्वरित पान २ वर)



*बीड: शहरातील सुप्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ. राधेश्याम आणि डॉ. प्रीती जाजू यांनी दिनांक ८ सप्टेंबर २०२४ रविवार रोजी आपल्या नवीन वास्तुत दवाखान्याचे स्थलांतर केले. या निमित्ताने डॉक्टर जाजू दांपत्यांना हृदयी शुभेच्छा देताना मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ, साप्ताहिक द स्कूल एक्सप्रेस चे मुख्य संपादक शेख एजाज़. यावेळी डॉ. अब्दुल हामेद, इंजि. काज़ी जुनैद आणि जमियत उलमा–ए–हिंद चे बीड जिल्हाध्यक्ष मुफ़्ती मुहम्मद अब्दुल्ला कासमी यांची प्रमुख उपस्थिती होती.*

## अंबा नगरीत शिवसेनेचा भव्य कामगार मेळावा संपन्न

### बीड विधानसभेवर बाजीराव चव्हाण शिवसेनेचा भगवा फडकवणारच मंगेशजी चिवटे

**अंबेजोगाई । प्रतिनिधी**

आई योगेश्वरीच्या पावन अंबाई नगरीमध्ये वंदनीय बाळासाहेब ठाकरे धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची समाजसेवेची शिकवण अंगीकारून. शिवसेना मुख्य नेते महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री मा.एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली काम करणाऱ्या समस्त शिवसैनिक व कामगारांचा शिवसेना कामगार मेळावा तसेच शिवसेना मध्यवर्ती कार्यालयाचा उद्घाटन सोहळा आज मा. श्री मंगेशजी



चिवटे (कक्ष प्रमुख मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष) यांच्या हस्ते संपन्न झाला आहे.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून आरोग्य दुत बाजीराव दादा चव्हाण हे उपस्थित होते. या कामगार मेळावा प्रसंगी अपंगाना कृत्रिम अवयव वाटप करण्यात आले आहे . मंगेशजी चिवटे यांनी आपल्या प्रभावी वक्तृत्व शैलीच्या माध्यमातून उपस्थित कामगाराचे महिलांचे व शिवसैनिकांचे मन जिंकले. ते म्हणाले दिव्यांग बांधवांसाठी बांधकाम कामगारासाठी आम्ही सदैव काम करणार व त्यांच्या भावना जाणून घेण्याचा प्रयत्न करणार. बांधकाम कामगार देशाचे भविष्य घडवू शकतात. शिवसेना अविरतपणे आरोग्यासाठी तुमच्या सेवेसाठी तत्पर आहे. बीड सारख्या मागासलेल्या व कामगारांचा जिल्हा म्हणून ओळख असलेल्या भागांमध्ये आरोग्यदुत बाजीराव चव्हाण यांनी केलेले काम हे उल्लेखनीय आहे अस म्हणत येत्या (उर्वरित पान २ वर)

# शिक्षकदिनी आदर्श शिक्षक पुरस्कार सन्मानापासुन वंचित ठेवल्याच्या निषेधार्थ लक्ष्यवेधी आंदोलन

## शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचा भार , विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परीणाम : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेकडून जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये चांगले काम करणाऱ्या शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात येतो. शिक्षकदिनी या पुरस्काराचे वितरण करणे आवश्यक असताना जिल्हा प्रशासनाच्या हलगर्जीपणा मुळे निवड प्रक्रिया पुर्ण होऊनही पालकमंत्री आणि यंत्रणेला वेळ नसल्याने गेल्यावर्षीच्या आणि



या वर्षीच्या पुरस्काराचे वितरण झाले नाही. शिक्षकदिनी गुरूजींना सन्मानापासुन वंचित ठेवल्याच्या निषेधार्थ व तातडीने पुरस्कार वितरण करण्यात यावे आणि शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचा भार वाढत असुन त्याचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होत असुन त्यांचे नुकसान होत आहे याबाबत आवश्यक उपाययोजना करण्यात यावी.याकडे जिल्हा प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.९ सोमवार रोजी जिल्हा परिषद कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारा वरील पायऱ्यांवर हातात पाटी पेन्सिल घेऊन मागण्यांचे घोषवाक्य लिहून लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक माध्यमिक) जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, पालकमंत्री बीड यांना देण्यात आले. यावेळी आंदोलनात रामनाथ खोड, शेख युनुस, सुदाम तांदळे, शेख मुबीन, शिवशर्मा शेलार, मुस्ताक शेख, रामधन जमाले जिल्हाध्यक्ष (इंटक) , नितीन पवार,बप्पासाहेब पवार आदी सहभागी होते.

(उर्वरित पान २ वर)

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com